Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

Accredited by
NBA
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 18/09/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आपल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## ख्यातनाम कादंबरीकार शिवाजी सावंत



शिवाजी गोविंदराव सावंत हे ख्यातनाम मराठी कादंबरीकार होते. त्यांचा जन्म ३१ ऑगस्ट १९४० रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा येथे झाला. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण आजरा येथे झाले. प्रथम वर्ष बी. ए. पर्यंत शिक्षण घेऊन पुढे वाणिज्य शाखेतून पदविका घेतली. त्यानंतर कोल्हापूरच्या 'राजाराम प्रशाले'त त्यांनी अध्यापन केले. पुढे पुणे येथे महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याच्या लोकशिक्षण या मासिकाचे संपादक म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

शिवाजी सावंत यांनी 'मृत्युंजय' ही आपली पहिली कादंबरी लिहिली. त्यांच्या या पहिल्याच कादंबरीने प्रभावी कादंबरीकार म्हणून त्यांची प्रतिमा प्रस्थापित झाली. 'छावा' आणि 'युगंधर' या त्यांच्या त्यानंतरच्या कादंबऱ्या. छावा ही छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरची, तर युगंधर ही भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावरची कादंबरी आहे. 'मृत्युंजय' आणि 'छावा' या कादंबऱ्यांची नाट्यरुपेही त्यांनी निर्माण केली.

या साहित्यकृतींच्या व्यतिरिक्त सावंत यांनी जे लेखन केले, त्यांत 'लढत' आणि 'संघर्ष' या दोन जीवनकहाण्यांचा अंतर्भाव होतो. 'अशी मने असे नमुने' आणि 'मोरावळा' मध्ये त्यांनी वेगवेगळ्या माणसांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. सावंत यांना अनेक साहित्य पुरस्कार आणि सन्मान मिळाले. मृत्युंजयला मिळालेले काही निवडक पुरस्कार असे: महाराष्ट्र राज्य पुरस्कार (१९६७), न. चिं. केळकर पुरस्कार (१९७२), भारतीय ज्ञानपीठाचा 'मूर्तिदेवी पुरस्कार' (१९९५), फाय फाऊंडेशन पुरस्कार (१९९६), आचार्य अत्रे विनोद विद्यापीठ पुरस्कार (१९९८). 'छावा'लाही महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला (१९८०). बडोदे येथे १९८३ मध्ये भरलेल्या 'बडोदे मराठी साहित्य संमेलना'चे ते अध्यक्ष होते. १९९७ मध्ये पुणे महानगरपालिकेतर्फे त्यांना सन्मानपत्र देण्यात आले. कोल्हापूर येथे १९९८ मध्ये भरलेल्या सातव्या कामगार साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अशा या ख्यातनाम साहित्यिकाचे १८ सप्टेंबर २००२ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Sep 18, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401